# महत्त्वाची सूचना

## जिल्हा परिषद पदभरती सन २०२३ बाबत महत्त्वाची सूचना

**दिनांक १६ जून २०२४ ते दिनांक २१ जून २०२४** या कालावधीत **आरोग्य सेवक (महिला) तसेच कंत्राटी ग्रामसेवक** पदाच्या परीक्षा नियोजित आहेत. त्याअनुषंगाने **महिला उमेदवारांचे लक्ष जिल्हा परिषद रत्नागिरी पदभरती जाहिरात दिनांक ०५.०८.२०२३ मधील मुद्दा क्रमांक ४.६ (ओळख पटवणे) कडे वेधण्यांत येत आहे.** परीक्षा केंद्रावर येताना केंद्रावरील प्रवेशाबाबत स्पष्टपणे नमूद केले आहे की, **ज्या महिला उमेदवारांच्या पहिल्या/मधल्या/शेवटच्या नावात विवाहानंतर फरक पडला असेल त्यांनी याबाबत विशेष खबरदारी घेणे आवश्यक आहे. जर प्रवेशपत्रावरील फोटो/नांव आणि ओळखपत्रावरील फोटोत/नावात कोणताही फरक/विसंगती असेल अशा उमेदवारास परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही. ज्या उमेदवारांनी आपल्या नावात बदल केला असेल अशा उमेदवारांनी मूळ राजपत्रित अधिसूचना किंवा मूळ विवाह प्रमाणपत्र प्रस्तुत केले तरच त्यांना परीक्षेसाठी प्रवेश देण्यात येईल. ज्या महिला उमेदवारांचे नावात विवाहानंतर बदल झाला असेल त्यांनी याबाबत विशेष खबरदारी घेणे आवश्यक आहे. परीक्षा केंद्रावर प्रवेशाकरीता अलीकडच्या काळातील फोटो असलेले वैध फोटो ओळखपत्र जसे पॅन कार्ड (Pan Card)/पारपत्र (Passport)/वाहनचालक परवाना (Driving Licence)/मतदार ओळखपत्र (Voter ID)/आधार कार्ड, बँक/पोस्ट फोटोसहीतचे पासबुक/फोटोसहीत असणारे नोंदणीकृत विद्यापीठ/कॉलेज चे फोटोसहीत ओळखपत्र/बार कॉन्सिलचे ओळखपत्र हे केंद्रावरील समवेक्षक/पर्यवेक्षकाला सादर करावे लागतात. त्यामुळे उमेदवारांचे प्रवेशपत्रावरील नाव व लग्नानंतरचे नाव यामध्ये तफावत असल्यास त्याबाबत जाहिरातीत नमूद केल्याप्रमाणे परीक्षा केंद्रावर पुरावा सादर केला नसल्यास त्यांचे परीक्षा केंद्रावरील प्रवेशाकरीता संबंधित ओळखपत्र ग्राहय धरले जाणार नाही. तसेच विवाहित महिला उमेदवारांचे बाबतीत प्रवेशपत्रावर (Hall ticket) लग्नापूर्वीचे नाव असेल व पॅन कार्ड वर लग्नानंतरचे नाव व वडीलांचे पूर्ण नाव असले तरी सदर पॅनकार्ड ओळखपत्र म्हणून ग्राहय धरले जाणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. अशा परिस्थितीत संबंधित उमेदवारांना मूळ विवाह प्रमाणपत्र किंवा नावात बदल केल्याबाबतची राजपत्रित अधिसूचना सादर करणे अनिवार्य राहिल.**

**त्यामुळे उमेदवारांना याद्वारे आवाहन करण्यात येते की, ओळखपत्रावरील नाव व प्रवेशपत्रावरील नाव हे सारखे असेल असे ओळखपत्र परीक्षा केंद्रावर परीक्षेचे वेळेस सादर करावे.** तसेच परीक्षेचे प्रवेशपत्र व सादर करण्यांत आलेले फोटो ओळखपत्र यामधील नावात कोणतीही तफावत आढळल्यास उमेदवाराचे केंद्रावरील प्रवेश नाकारण्यांत येईल. रेशनकार्ड, शिकाऊ वाहन परवाना हे ओळखपत्र म्हणून ग्राहय धरता येणार नाही. तेव्हा जाहिरात व प्रवेशपत्र यातील सर्व सूचनांचे बारकाईन अवलोकन करुनच उमेदवारांनी परीक्षा केंद्रावर उपस्थित रहावे.

**दिनांक :- १३/०६/२०२४**

**ठिकाण :- रत्नागिरी.**

(किर्ती किरण पुजार, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद रत्नागिरी.